**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** सिंधखेड राजा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0115 **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/06/2025 02:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 24/06/2025
      **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2025
      **Time From (वेळेपासून):** 14:53 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:53 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 25/06/2025 **Time (वेळ):** 01:52 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 001
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2025 01:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय सिंदखेडराजा,तहसिल कार्यालय सिंदखेडराजा

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** सिंधखेड राजा
   **District(State) (जिल्हा(राज्य)):** बुलढाणा(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.दिलीप लक्ष्मण काळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1967

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिंदखेडराजा,सिंदखेडराजा,सिंधखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिंदखेडराजा,सिंदखेडराजा,सिंधखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7020673208

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1. श्री. रावसाहेब बापुराव काकडे | | | 1. रा पटवारी कलनी सिंदखेडराजा, सिंदखेडराजा,सिंधखेड राजा, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | 2 श्री. मनोज काशीनाथ ीने | | | 1. सिव्हील कलनी, देऊळगांवराजा,देऊळगांवराजा, सिंधखेड राजा,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपैच्या 14 नोटा असे एकुन 7000 रुपै | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद शासकिय विश्रामगृह सि.राजा दिनांक 25.06.2025 श्री.दिलीप लक्ष्मण काळे, वय 58 वर्षे, व्यवसाय शेती, शिक्षण 12 वी पास, रा. वार्ड नं. 17, नागपुर डाकलाईन, सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा मो. नं. 7020673208 मी वरिलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो. व शेतीचा व्यवसाय करतो. दिनांक 20.05.2025 अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा घटकाचे पोलीस निरीक्षक पवार साहेब यांना फोनव्दारे माहिती दिली की, माझे वडील लक्ष्मण काळे यांचेकडे मौजे तांदुळवाडी, ता. सिंदखेडराजा शिवारात गट नं.24 मध्ये 1.33 हे. आर शेतजमीन असून, वडील लक्ष्मण काळे हे सन 2019 मध्ये मयत झाल्याने सदर शेतीच्या सातबा-यावर वारसा हक्काने माझी आई व आम्ही तिघे भाऊ असे चार जणाचे नावे लागलेले आहे. सदर शेतीचा सातबा-यावरील आमच्या तिन्ही भावांचे नाव कमी करुन आमची आई राहीबाई लक्ष्मण काळे यांचे नावावर होण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसुल संहीता 1966 च्या कलम 85 (2) प्रमाणे वाटणीपत्रकाचा प्रस्ताव तयार करुन आमचे गावचे तलाठी काकडे साहेब यांचेसह जावून तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथील संबधीत महसुल सहायक, श्री. झिने साहेब यांचेकडे अंदाजे दोन महिन्यापुर्वी दिलेला आहे. त्यानंतर दिनांक 11.05.2025 रोजी मी काकडे साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला सांगीतले की, तुमचे भावांचे नावे कमी करुन आईचे नावे शेती करण्यासंबधीचा आदेश काढण्याकरिता महसुल सहायक झिने हे 7000/-रुपयांची मागणी करीत आहे. त्यांना पैसे दिल्याशिवाय ते तुमचे काम करणार नाही. तुम्ही पैसे घेवून या आपण त्यांचेकडे जावून त्यांना पैसे देवून काम करुन घेवू असे म्हणत आहेत. मी फोनवर दिलेल्या माहितीवरुन पोलीस निरीक्षक, श्री. रमेश पवार यांनी पुढील कार्यवाहीकरीता दिनांक 20.05.2025 रोजी राज्य परिवहन महामंडळ चिखली आगाराचे दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेतले. पवार साहेब, पंच व सापळा पथक असे त्यांचे कार्यालयाचे शासकिय वाहनाने सिंदखेडराजा शिवारात हजर आले. त्यानुसार पवार साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी सुध्दा सिंदखेडराजा शिवारात कार्यवाही पथकाजवळ पोहचलो. त्यावेळी पवार साहेब यांनी माझा तसेच पंचाचा आपसात परिचय करुन देवून माझी वरिलप्रमाणे रितसर लेखी तक्रार नोंद करुन घेतली. त्यांनतर पवार साहेब यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार यातील लोकसेवक काकडे व लोकसेवक झिने यांची रितसर लाच मागणी पडताळणी आयोजित केली असता, पडताळणी कार्यवाही मध्ये झालेल्या भेटीदरम्यान माझे, लोकसेवक काकडे व झिने यांचेशी कामासंबधी बोलणे झाले. सदर बोलणी दरम्यान तलाठी श्री.काकडे म्हणाले की, पाच देवुन टाका साहेबाला अन तुम्ही दोन, सात घेवुन टाका, अन करुन टाका न जावु दया जे हे ते रितीरिवाजाप्रमाणे, मी माझ त्यायचं कस हे आता आमचे संबंध हे मले देले देले नही देले, त्यावर मी त्यांना म्हणालो की, किती दयायचे, त्यावर लोकसेवक श्री.झिने म्हणाले की, सात आठ देवून दया न साहेब आले की, देवुन टाकु ते, त्यावर मी त्यांना म्हणालो की, बर मग मी उदया येवु का पैसे घेवुन, त्यावर लोकसेवक श्री.काकडे म्हणाले की, हा ते सात देवुन टाका तुम्ही, महयाजवळ दया नाहीतर यायच्याजवळ देवुन टाका, असे म्हणुन लोकसेवक काकडे, तलाठी यांनी झिने यांना आर्थिक गैरलाभ पोहचावा या उददेशाने मला झिने, महसूल सहायक यांना 7000/-रुपये लाच रक्कम देण्यासाठी अपप्रेरित केले. तसेच महसुल सहायक झिने यांनी सदर लाच रक्कम स्विकारण्यासाठी संमती दर्शवली. त्यावरुन सदर प्रकरणात दिनांक 21.05.2025 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात

आले त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक 21.05.2025 रोजी सदर प्रकरणात सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस निरीक्षक, पवार साहेब व सापळा पथक तसेच दोन्ही पंच हे सापळा कार्यवाही कामी लागणारे आवश्यक त्या साहित्यासह सिंदखेडराजा शिवारात हजर आले. त्यावेळी मी सुध्दा सापळा पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी पो.नि. पवार साहेब यांनी सांगीतले की, लोकसेवक काकडे यांनी महयाजवळ देवून दया असे म्हणून लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतलेले असल्याने आपण, लोकसेवक काकडे, तलाठी यांचेवरच सापळा कारवाई आयोजित करु असे सांगीतले. त्यानुसार मला, पोलीस निरीक्षक, पवार साहेब यांनी लोकसेवक श्री. काकडे यांना लाच रक्कम म्हणून देण्यासाठी 7,000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता, मी माझेजवळील 500/-रुपये दराच्या भारतीय चलनातील 14 नोटा असे ऐकून 7,000/-रुपये पवार साहेब यांचेकडे हजर केले. त्यावेळी पवार साहेब यांनी सापळा पथकातील सदस्याचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक नोंद करुन घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम माझे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिष्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या त्याबाबतचा सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर सदर प्रकरणात तलाठी काकडे बसत असलेले त्यांचे सिंदखेडराजा ते देऊळगांवराजा रोडवरील तलाठी कार्यालयात सापळा कार्यवाही आयोजीत केली असता सदर सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. काकडे यांनी मला तुम्ही जा ना तिकड करून घ्याना तिकड, तुम्ही त्याले देवून टाका असे म्हणून लाच रक्कम न स्विकारल्याने मी लोकसेवक काकडे यांना लोकसेवक झिने, महसुल सहायक यांना फोन करण्यास सांगीतले असता लोकसेवक झिने यांनी मी आॅडिट मध्ये आहे, आज मला वेळ नाही असे म्हणून भेटण्यास नकार दिल्याने मी व पंच क्र. 1 असे कार्यवाही पथकासह परत आलो. त्यावेळी मी पंचासमक्ष सांगीतले की, लोकसेवकांना माझेवर संशय आलेला असावा म्हणून ते सध्या माझेकडून लाच रक्कम स्विकारणार नाही. आपण काही दिवस थांबून परत सापळा कार्यवाही आयोजित करु अशी विनंती केली. त्यावेळी सर्वानुमते मी जेंव्हा फोन करुन सापळा कार्यवाही आयोजित करण्याबाबत पवार साहेब यांना कळविले नंतर पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनंाक 23.06.2025 रोजी मी पोलीस निरीक्षक, पवार साहेब यांना फोन करुन पुढील सापळा कार्यवाही आयोजित करण्याबाबत विनंती केली असता दिनंाक 23.06.2025 रोजी पोलीस निरीक्षक, पवार साहेब व पोलीस उपअधिक्षक, श्री. चोरमले साहेब तसेच सापळा पथक व दोन्ही पंच असे सिंदखेडराजा येथे हजर आले. त्यावेळी आपण सर्वानुमते लोकसेवक काकडे हे बसत असलेल्या तलाठी कार्यालयात सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविले. त्यानुसार पवार साहेब यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवून पंच क्र 1 श्री निगडे यांचेसह तलाठी कार्यालयाकडे रवाना करुन सापळा कार्यवाही आयोजित केली असता, आम्ही सिंदखेडराजा ते देऊळगांवराजा रोडवर असलेल्या काकडे यांचे तलाठी कार्यालयात जावून तलाठी काकडे यांची भेट घेतली असता काकडे तलाठी यांनी मला तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे महसुल सहायक श्री. झिने साहेब यांना भेटून पैसे देण्याबाबत सांगीतले. त्यावरुन मी व पंच क्र 1 असे तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे जावून झिने साहेब यांची भेट घेवून त्यांचेशी कामासंबधाने चर्चा केली असता झालेल्या चर्चेदरम्यान झिने साहेब मला म्हणाले की, किती पैसे आणले, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, तुम्ही सांगीतले प्रमाणे सात हजार रुपये आणलेत, त्यावेळी झिने साहेब मला म्हणाले की, तेवढया पैशात साहेब सही करणार नाही, तुम्हाला अजुन पैसे दयावे लागतील असे म्हणून वाढीव लाच रक्कमेबाबत बोलणी केली, त्यावेळी मी त्यांना किती पैसे दयावे लागतील अषी विचारणा केली असता झिने यांनी तलाठी काकडे यांना फोन करुन पाच हजारात साहेब सही करणार नाही असे सांगीतले, त्यावेळी काकडे यांनी मला तलाठी कार्यालयात येण्यास सांगीतले. त्यावरुन मी व पंच क्र 1 श्री. निगडे असे परत तलाठी कार्यालयात आलो असता तलाठी काकडे मला म्हणाले की, माझी तब्बेत ठिक नाही तुम्ही उदया या आपण उदया पाहु असे सांगीतल्याने आम्ही कार्यवाही पथकासह परत आलो व घडलेली हकीकत सापळा पथकास सांगीतली. सदर प्रकरणात दिनांक 24.06.2025 रोजी पुन्हा सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 24.06.2025 रोजी सदर प्रकरणात सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस निरीक्षक, पवार साहेब व पोलीस उपअधिक्षक, श्री.चोरमले साहेब तसेच सापळा पथक व दोन्ही पंच असे शासकिय वाहनाने सिंदखेडराजा येथे हजर आले. त्यावेळी मी सुध्दा पोनि. पवार साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सापळा पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी पवार साहेब यांनी लाच रक्कम माझे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशयात ठेवून दिली. पवार साहेब यांनी मला व पंचाना सांगीतले की, दिनंाक 23.06.2025 रोजी लोकसेवक झिने यांनी पाच हजारात तहसिलदार साहेब सही करणार नाही असे बोलणी केलेली असल्याने आज रोजी प्रथम आपणास तहसिलदार साहेब यांचा लोकसेवक झिने यांनी मागीतलेल्या लाच रक्कमेत सहभाग आहे किंवा कसे याबाबत खात्री करावी लागेल असे सांगुन माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र 1 श्री निगडे यांना तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे तहसिलदार साहेब यांची भेट घेण्याकरीता

रवाना केले. त्यावेळी आम्ही तहसिल कार्यालय येथे जावून तहसिलदार यांची भेट घेतली त्यावेळी झालेल्या बोलणी दरम्यान मी तहसिलदार साहेबांना माझे कामाबाबत सांगून झिने,महसुल सहायक हे आपल्याकरिता पैशाची मागणी करीत असल्याबाबत सांगीतले असता तहसिलदार साहेब मला म्हणाले की, कोणालाही पैसे दयायची गरज नाही, असे सांगीतल्याने मी कार्यवाही पथकाजवळ परत आलो व घडलेली हकीकत पवार साहेब व चोरमले साहेब तसेच सापळा पथकास सांगीतली. सदर प्रकरणात लोकसेवक काकडे यांनी मला दिनांक 24.06.2025 रोजी बोलाविलेले असल्याने आपण सर्वानुमते तलाठी काकडे बसत असलेल्या तलाठी कार्यालयात पुढील सापळा कार्यवाही आयोजित केली असता सापळा कार्यवाही दरम्यान मी लोकसेवक काकडे यांचेशी कामासंबधाने चर्चा केली असता लोकसेवक काकडे हे मला व पंच क्र 1 श्री. निगडे यांना घेवून तहसिल कार्यालय सिंदखेडराजा येथे गेले व त्यांनी आमची भेट लोकसेवक झिने यांचेशी घालून दिली. त्यावेळी आमच्यात शेतीचे कामासंबधाने बोलणी झाली त्यावेळी मी माझेजवळील लाच रक्कम काढून झिने साहेब यांचेसमोर धरुन सात हजार आहे झिने साहेब असे म्हणालो असता, त्यावेळी तलाठी काकडे हे झिने यांना म्हणाले की, ठेवून घ्या झिने साहेब, हे ठेवून घ्या , बाकीचे जे काय राहतील ते देण्याची हमी मी घेतो असे म्हणाले, त्यावेळी झिने यांनी त्यांचे डाव्या हाताने माझेजवळील लाच रक्कम स्विकारुन नेसत्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवून दिले. त्यावेळी मी माझे गळ्यातील रुमाल काढून हातात घेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला असता पोलीस उपअधिक्षक चोरमले साहेब, पोलीस निरीक्षक पवार साहेब व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी लोकसेवक श्री. काकडे तलाठी व लोकसेवक श्री. झिने यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1. श्री. रावसाहेब बापुराव काकडे, वय 57 वर्ष, पद तलाठी, सज्जा खामगांव/ तांदुळवाडी, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा, रा. पटवारी कॉलनी सिंदखेडराजा, ता. सिंदखेडराजा, तसेच लोकसेवक क्र 2 श्री. मनोज काशीनाथ झिने, वय 49 वर्ष, पद महसुल सहायक, तहसिल कार्यालय सिंदखेडराजा, रा. सिव्हील कॉलनी,देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यावेळी पंच क्रमांक 1 श्री. निगडे यांनी लोकसेवक श्री. मनोज झिने यांची अंगझडती घेतली असता त्यांचे नेसत्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यात लाचेची रक्कम मिळून आली. त्यावेळी कारवाई पथकाने झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर सापळा पंचनामा केलेला आहे. दिनांक 20.05.2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आम्हा तिन्ही भावांचे नाव कमी करुन माझे आईचे नावे शेती करण्यासंबधीच्या महाराष्ट जमीन महसुल संहीता 1966 च्या कलम 85(2) प्रमाणे वाटणीपत्रकाच्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Ashish Suresh Ingale(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

प्रस्तावावरुन तहसिलदार यांचा आदेश काढण्याकरिता लोकसेवक श्री. काकडे, तलाठी यांनी मला साहेबांकरिता ५०००/— रुपये व झिने महसुल सहायक यांना २०००/—रुपये लाच दयावी याकरिता अपप्रेरित केले. तसेच आलोसे. मनोज झिने, महसुल सहायक यांनी ७०००/—रुपये लाच मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यावरुन सदर प्रकरणात दिनांक २४.०६.२०२५ रोजी तहसिल कार्यालयाचे इमारतीमध्ये १४.५३ ते १५.२६ वा दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही मध्ये आलोसे. मनोज झिने यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारुन स्वत:चा आर्थिक गैरलाभ करुन घेतला म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

मी दिलेली फिर्याद संगणकावर नापोकॉ. विनोद लोखंडे यांनी टंकलिखित केली संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेल्या फिर्यादची प्रिंट काढून ती मी वाचून पाहीली माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. समक्ष सही, रमेश पवार पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अंमलदार
सिंदखेड राजा पो.स्टे.
जि.बुलडाणा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Ashish Suresh Ingale
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य OT खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**